# राज्यशास्त्र

## इयत्ता ११वी







# भारताचे संविधान

## भाग ४ क

# नागरिकांची मूलभूत कर्तव्ये

**अनुच्छेद ५१ क**

**मूलभूत कर्तव्ये – प्रत्येक भारतीय नागरिकाचे हे कर्तव्य असेल की त्याने –**

(क) प्रत्येक नागरिकाने संविधानाचे पालन करावे. संविधानातील आदर्शांचा, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीताचा आदर करावा.

(ख) स्वातंत्र्याच्या चळवळीला प्रेरणा देणाऱ्या आदर्शांचे पालन करावे.

(ग) देशाचे सार्वभौमत्व, एकता व अखंडत्व सुरक्षित ठेवण्यासाठी प्रयत्नशील असावे.

(घ) आपल्या देशाचे रक्षण करावे, देशाची सेवा करावी.

(ङ) सर्व प्रकारचे भेद विसरून एकोपा वाढवावा व बंधुत्वाची भावना जोपासावी. स्त्रियांच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणतील अशा प्रथांचा त्याग करावा.

(च) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे जतन करावे.

(छ) नैसर्गिक पर्यावरणाचे जतन करावे. सजीव प्राण्यांबद्दल दयाबुद्धी बाळगावी.

(ज) वैज्ञानिक दृष्टी, मानवतावाद आणि जिज्ञासूवृत्ती अंगी बाळगावी.

(झ) सार्वजनिक मालमत्तेचे जतन करावे. हिंसेचा त्याग करावा.

(ञ) देशाची उत्तरोत्तर प्रगती होण्यासाठी व्यक्तिगत व सामूहिक कार्यात उच्चत्वाची पातळी गाठण्याचा प्रयत्न करावा.

(ट) ६ ते १४ वयोगटातील आपल्या पाल्यांना पालकांनी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.

शासन निर्णय क्रमांक : अभ्यास-2116/(प्र.क्र.43/16) एसडी-4 दिनांक 25.4.2016 अन्वये स्थापन करण्यात आलेल्या समन्वय समितीच्या दिनांक 20.6.2019 रोजीच्या बैठकीमध्ये हे पाठ्यपुस्तक सन 2019-20 या शैक्षणिक वर्षापासून निर्धारित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

# राज्यशास्त्र

## इयत्ता अकरावी

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

A8V4A7

आपल्या स्मार्टफोनवरील DIKSHA App द्वारे पाठ्यपुस्तकाच्या पहिल्या पृष्ठावरील Q.R. Code द्वारे डिजिटल पाठ्यपुस्तक, त्या पाठासंबंधित अध्ययन-अध्यापनासाठी उपयुक्त दृक्-श्राव्य साहित्य उपलब्ध होईल.

प्रथमावृत्ती : २०१९
पुनर्मुद्रण : ऑक्टोबर २०२०
© महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे ४११ ००४.
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे या पुस्तकाचे सर्व हक्क राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्धृत करता येणार नाही.

**राज्यशास्त्र विषय समिती**

डॉ.श्रीकांत परांजपे, अध्यक्ष
डॉ.प्रकाश पवार, सदस्य
डॉ.मोहन खडसे, सदस्य
डॉ.अभय दातार, सदस्य
प्रा.संगीता आहेर, सदस्य
प्रा.अजिंक्य गायकवाड, सदस्य
डॉ.नीता बोकील, सदस्य
श्री.मोगल जाधव, सदस्य
वर्षा सरोदे, सदस्य-सचिव

**लेखक**

डॉ.श्रीकांत परांजपे
डॉ.प्रकाश पवार
डॉ.अभय दातार
डॉ.संहिता जोशी

**मुखपृष्ठ व सजावट**

श्री.मुकीम शेख

**नकाशाकार**

श्री.रविकिरण जाधव

**भाषांतरकार**

प्रा.संगिता दीक्षित
श्रीमती मुग्धा महाबळ
प्रा.वीणा केंची

**अक्षरजुळणी** : मुद्रा विभाग, पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे
**कागद** : ७० जी.एस.एम.क्रिमवोव्ह
**मुद्रणादेश** : N/PB/2021-22/Qty.- 30,000
**मुद्रक :** M/s. Kanta Printers, Nagpur

**राज्यशास्त्र अभ्यासगट समिती**

डॉ.प्रविण भागडीकर
प्रा.संगिता दीक्षित
प्रा.राजेंद्र इंगळे
प्रा.वीणा केंची
डॉ.रोहिदास मुंढे
डॉ.व्यंकटलक्ष्मी पुरणशेट्टीवार
प्रा.अरुणा खामकर
प्रा.पीतांबर उरकुडे
प्रा.दिलीप कडू
डॉ.नंदकिशोर बोकाडे
डॉ.रामदास ढगे
डॉ.बालाजी कतूरवार
डॉ.प्रभाकर लोंढे
श्री.रविंद्र जिंदे
श्री.सुभाष राठोड
श्रीमती मुग्धा महाबळ

**निर्मिती**

**श्री. सच्चितानंद आफळे,**
मुख्य निर्मिती अधिकारी
**श्री. प्रभाकर परब,**
निर्मिती अधिकारी
**श्री. शशांक कणिकदळे,**
साहाय्यक निर्मिती अधिकारी

**संयोजक**

सौ. वर्षा सरोदे
साहाय्यक विशेषाधिकारी,
इतिहास व नागरिकशास्त्र
पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे.

**प्रकाशक**

**श्री. विवेक उत्तम गोसावी**, नियंत्रक
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ, प्रभादेवी,
मुंबई-२५.

# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम**
**समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा
व त्याच्या सर्व नागरिकांस:
सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**
निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;
**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित**
**करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

## राष्ट्रगीत

जनगणमन–अधिनायक जय हे
भारत–भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत–भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

## प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

# प्रस्तावना

विद्यार्थी मित्रांनो,

इयत्ता नववी व दहावी या इयत्तांमध्ये तुम्हांला राज्यशास्त्र या विषयाची तोंडओळख झालेली आहे. पुनर्रचित अभ्यासक्रम २०१२ नुसार अभ्यासक्रम बदलातील उद्दिष्टे डोळ्यांसमोर ठेवून इयत्ता ११ वी च्या पाठ्यपुस्तकाची रचना करण्यात आली आहे. इयत्ता अकरावीचे पुस्तक तुमच्या हाती देताना आम्हांला आनंद वाटतो.

इयत्ता अकरावीच्या पाठ्यपुस्तकात चार विभाग केले आहेत - राजकीय संकल्पना, तुलनात्मक शासनसंस्था, लोकप्रशासन आणि आंतरराष्ट्रीय संबंध. या प्रत्येक विभागाची सुरुवात त्या संबंधित विषयाच्या प्रस्तावनेने करण्यात आलेली आहे. या क्षेत्रांतील महत्त्वाच्या संकल्पनांची तोंडओळख करून देणे हा यामागील उद्देश आहे. या सर्व संकल्पना भारताच्या संदर्भात अभ्यासायच्या आहेत.

अध्ययन अधिक सुलभ, रंजक व कृतीयुक्त होण्यासाठी तुम्हांला माहितीपर चौकटी, विविध कृती, क्यू.आर.कोडवर देण्यात येणारे साहित्य याचा निश्चितच उपयोग होईल.

राज्यशास्त्र या विषयाचा अभ्यास का करावा? याचे उत्तर तुम्हांला या पाठ्यपुस्तकाच्या अध्ययनाने जरूर मिळेल. जगाकडे बघण्याचा एक दृष्टिकोन या विषयाच्या अभ्यासाने मिळेल. हा विषय भारताच्या अभ्यासाबरोबरच बाहेरच्या जगाशी देखील तुमची ओळख करून देईल. भारताची शासनसंस्था कसे काम करते, शासनसंस्थेच्या कामकाजात नागरिक म्हणून तुमची भूमिका काय असावी, तुमच्या आजूबाजूला विविध स्तरांवर घडणाऱ्या घटनांकडे पाहण्याचे, अनुभवण्याचे आणि त्या घटनांचे विश्लेषण करण्याचे साधन या विषयामुळे तुम्हांला प्राप्त होईल. हा विषय सक्षम नागरिक बनवेल ज्यामुळे तुम्ही देशासाठी चांगले काम करण्यास प्रेरित व्हाल. विद्यार्थ्यांना सक्षम होण्यासाठी पाठ्यपुस्तकातील आशय उपयुक्त आहे.

विषय समिती, अभ्यासगट, लेखक आणि चित्रकार यांनी अतिशय आस्थेने आणि परिश्रमपूर्वक हे पुस्तक तयार केले आहे. मंडळ या सर्वांचे मनःपूर्वक आभारी आहे.

तुमच्या सूचना, अभिप्राय आम्हांस जरूर कळवा. चांगल्या सूचनांचे आम्ही निश्चितच स्वागत करू.

विद्यार्थी, शिक्षक व पालक या पुस्तकाचे स्वागत करतील, अशी आशा आहे.

**(डॉ.सुनिल मगर)**
संचालक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

पुणे
दिनांक : २० जून २०१९
भारतिय सौर दिनांक : ३० ज्येष्ठ १९४१

# – शिक्षकांसाठी –

### राज्यशास्त्र ११ वी विषयाच्या अध्यापनाचा दृष्टिकोन

इयत्ता ११वी आणि १२वी च्या अभ्यासक्रमाबाबतचा दृष्टिकोन सर्वव्यापी आणि एकात्म आहे. इयत्ता ११वी च्या विद्यार्थ्यांना राज्यशास्त्राच्या विविध उपघटकांची तोंडओळख करून देण्यात आलेली आहे. इयत्ता १२वी चे पुस्तक समकालीन राज्यशास्त्रातील घटनांशी संबंधित असेल.

राजकीय संकल्पना, तुलनात्मक शासन आणि राजकारण, लोकप्रशासन आणि आंतरराष्ट्रीय संबंध या उपघटकांचा ११वी च्या राज्यशास्त्राच्या पुस्तकात समावेश केला आहे. जरी हे सर्व उपघटक स्वतंत्र विषय असले तरी ते परस्परांशी जोडलेले आहेत. म्हणूनच हे उपघटक शिकवताना यातील परस्पर संबंध लक्षात घेऊन शिकवणे गरजेचे आहे. उदाहरणार्थ, पहिल्या भागातील समता आणि न्याय या संकल्पना तुलनात्मक शासनाचा अभ्यास करताना महत्त्वाच्या ठरतात. तसेच या संकल्पना विकास प्रशासनाचा अभ्यास करतानाही महत्त्वाच्या ठरतात. याचप्रमाणे जेव्हा आपण शेवटच्या भागात आंतरराष्ट्रीय घटनांचा अभ्यास करतो तेव्हा तुलनात्मक शासन या भागातील विविध शासन प्रकारांच्या माहितीचा उपयोग होतो.

**पारंपरिक वर्ग अध्यापनाबाहेरील उपक्रम :**

- उपक्रम : राज्य ही संकल्पना अमूर्त आहे, परंतु शासन ही मूर्त संकल्पना आहे म्हणूनच या दोन्हीतील फरक समजून घेणे महत्त्वाचे ठरते. भारतांतर्गत राष्ट्रे ओळखा. ती राज्ये का नाहीत याचा शोध घ्या.
- वर्ग चर्चा : भारतातील विविधतेवर चर्चा घडवून आणा. ही विविधता धर्म, प्रदेश आणि भाषा इत्यादींच्या संदर्भात स्पष्ट करा.
- सादरीकरण : स्वातंत्र्य, हक्क, समता आणि न्याय यांपैकी कोणतीही संकल्पना घ्या. भारतीय संदर्भात त्याचा अर्थ आणि अंमलबजावणी यांवर तक्ता तयार करा.
- नकाशांचा वापर : तुलनात्मक शासन आणि आंतरराष्ट्रीय संबंध या दोन्ही विभागांसाठी नकाशे हे महत्त्वाचे उपयोगी साधन आहे हे लक्षात घेऊन त्यांचा उपयोग करा.
- तुलनात्मक तक्ते : विद्यार्थ्यांना तीन देशांबाबत तुलनात्मक तक्ते करायला सांगणे उपयुक्त ठरेल.
- क्षेत्र भेट : शासनाचे प्रशासकीय कार्य समजून घेण्यासाठी कोणत्याही शासकीय कार्यालयाला भेट देणे उपयुक्त ठरेल.
- सांघिक उपक्रम : एखाद्या विद्यार्थी गटाचे मंत्रिमंडळ तयार करून सद्यस्थितीतील विषयांवर धोरण निर्मिती करून घेणे.
- अभिरूप संयुक्त राष्ट्रे : कोणतीही आंतरराष्ट्रीय समस्या घ्या. मुलांना विविध देशांचे प्रतिनिधित्व करायला सांगून त्यानुसार समस्यांवर भूमिका मांडायला सांगा.
- काही महत्त्वाची संकेतस्थळे या पृष्ठावर तसेच प्रत्येक पाठाच्या शेवटी पूरक माहितीसाठी websites देण्यात आल्या आहेत.

| | |
|---|---|
| **भारतीय शासनसंस्था** | : https://www.india.gov.in/ |
| **अमेरिकन शासनसंस्था** | : https://www.usa.gov./ |
| **युनायटेड किंगडमची शासनसंस्था** | : https://www.gov.uk/ |
| **संयुक्त राष्ट्रे** | : https://www.un.org/en/index.html |

# क्षमता विधाने

| क्र. | घटक | क्षमता |
|---|---|---|
| १. | राजकीय संकल्पना | • राज्य आणि आधुनिक राज्यसंस्थेचा उदय या संकल्पना स्पष्ट करता येणे.<br>• स्वातंत्र्य, समता, हक्क व न्याय या राजकीय संकल्पना जाणून घेणे.<br>• या राजकीय संकल्पनांचा भारतातील सामाजिक विकासावर होणारा परिणाम जाणून घेणे. |
| २. | तुलनात्मक शासन आणि राजकारण | • अमेरिका, इंग्लंड व भारताच्या राजकीय व्यवस्थेतील साम्य व फरकाचे मुद्दे स्पष्ट करता येणे.<br>• राजकीय पक्ष आणि दबाव गट यांची सामाजिक व राजकीय बदल आणि आर्थिक विकासातील भूमिका स्पष्ट करता येणे.<br>• भारतीय न्यायमंडळाची बदलती भूमिका स्पष्ट करता येणे. |
| ३. | लोकप्रशासन | • भारतीय प्रशासकीय सेवेची मूळ चौकट/संरचना स्पष्ट करता येणे.<br>• विकासाच्या प्रक्रियेत लोकप्रशासनाची भूमिका स्पष्ट करता येणे.<br>• लोकांचे प्रश्न आणि प्रशासनाची बदलती भूमिका यातील परस्परसंबंध सांगता येणे.<br>• इ-शासनाचे महत्त्व सांगता येणे. |
| ४. | आंतरराष्ट्रीय संबंध | • आतंरराष्ट्रीय सहकार्य आणि आंतरराष्ट्रवादाचे महत्त्व स्पष्ट करता येणे.<br>• समकालीन काळातील प्रादेशिक संघटनांच्या उदयामागची कारणमीमांसा करणे.<br>• भारताच्या अलिप्ततावादाच्या धोरणातील दृष्टिकोन स्पष्ट करता येणे. |

# अनुक्रमणिका


जगाचा नकाशा

**भाग १ : राजकीय संकल्पना**

प्रस्तावना ........

१. राज्य ........ २

२. स्वातंत्र्य आणि हक्क ........ ९

३. समता आणि न्याय ........ १८

**भाग २ : तुलनात्मक शासन आणि राजकारण**

प्रस्तावना ........

४. संविधानिक शासन ........ २८

५. प्रतिनिधित्वाची संकल्पना ........ ३६

६. न्यायमंडळाची भूमिका ........ ४४

**भाग ३ : लोकप्रशासन**

प्रस्तावना ........

७. लोकप्रशासन ........ ५३

८. विकास प्रशासन ........ ६२

**भाग ४ : आंतरराष्ट्रीय संबंध**

प्रस्तावना ........

९. १९४५ नंतरचे जग – I ........ ७२

१०. १९४५ नंतरचे जग – II ........ ८२



• **S.O.I. Note :** The following foot notes are applicable : (1) © Government of India, Copyright : 2019. (2) The responsibility for the correctness of internal details rests with the publisher. (3) The territorial waters of India extend into the sea to a distance of twelve nautical miles measured from the appropriate base line. (4) The administrative headquarters of Chandigarh, Haryana and Punjab are at Chandigarh. (5) The interstate boundaries amongst Arunachal Pradesh, Assam and Meghalaya shown on this map are as interpreted from the “North-Eastern Areas (Reorganisation) Act. 1971,” but have yet to be verified. (6) The external boundaries and coastlines of India agree with the Record/Master Copy certified by Survey of India. (7) The state boundaries between Uttarakhand & Uttar Pradesh, Bihar & Jharkhand and Chattisgarh & Madhya Pradesh have not been verified by the Governments concerned. (8) The spellings of names in this map, have been taken from various sources.

• **या पाठ्यपुस्तकातील राष्ट्रध्वजाचे रंग प्रमाणित रंगछटांप्रमाणे नसल्यास ते तांत्रिक मर्यादांमुळे झाले आहेत.**

**विषय प्रवेश...**

यावर्षी, प्रथमच आपण राज्यशास्त्र हा एक स्वतंत्र विषय म्हणून अभ्यासणार आहोत. शाळेत तुम्ही हा विषय 'इतिहास आणि नागरिकशास्त्र' आणि 'इतिहास आणि राज्यशास्त्र' म्हणून अभ्यासला होता. नागरिकशास्त्र या विषयात तुम्ही व्यक्तीचे हक्क आणि कर्तव्य याविषयी माहिती करून घेतली आहे. राज्यशास्त्र या विषयात राजकीय व्यवस्था आणि संविधानाचा अभ्यास केला आहे.

आता आपण राज्यशास्त्राचा स्वतंत्र विषय म्हणून अभ्यास करताना त्यांच्या वेगवेगळ्या मिती समजून घेण्याची गरज आहे. अकरावी आणि बारावीत याचा प्रामुख्याने विचार करायचा आहे. अकरावीच्या अभ्यासक्रमात राज्यशास्त्राच्या या घटकांचा अभ्यास केला जाईल : (i) राज्यशास्त्रातील महत्त्वाच्या संकल्पनांची ओळख, (ii) तुलनात्मक शासन आणि राजकारण, (iii) लोकप्रशासन, (iv) आंतरराष्ट्रीय संबंध. विषयाच्या व्याप्तीचा समग्र दृष्टिकोनातून अभ्यास करण्यासाठीचा पाया या पुस्तकाद्‌वारे तयार केला जाणार आहे.

या पुस्तकात चार भाग आहेत. राज्यशास्त्राच्या पारंपरिक क्षेत्रांशी हे चार विभाग संबंधित आहेत. प्रत्येक विभागात स्वतंत्र प्रस्तावनेच्या मदतीने तुम्हांला त्या क्षेत्राची ओळख करून दिली आहे, ती जरूर अभ्यासा. यामुळे तुम्हांला विषय अधिक चांगल्या पद्‌धतीने समजण्यास मदत होईल. प्रत्येक पाठात तुम्हांला काही कृती करण्यास/शोध घेण्यास सुचवले आहे. या कृती जरूर करून पहा.

इयत्ता बारावीत, या क्षेत्रात घडून आलेले नवीन बदल आपण अभ्यासणार आहोत. उदा., जागतिकीकरण, मानवतावादाचे आस्थेचे विषय, पर्यावरण, दारिद्र्य इत्यादींसारख्या संकल्पना अभ्यासणार आहोत. शासन आणि लोकप्रशासन या क्षेत्रांत आपण सुशासन आणि राष्ट्रीय एकात्मता यांच्याशी संबंधित बाबी अभ्यासणार आहोत. आंतरराष्ट्रीय संबंध अभ्यासताना १९९१ नंतरचे जग प्रामुख्याने अभ्यासणार आहोत.

या दोन वर्षांत आपण विषयाच्या मिती व विषयाची प्राथमिक ओळख याच्याही पलीकडे जाणे अपेक्षित आहे. विषयातील काही संकल्पना तुम्ही दैनंदिन व्यवहारात वापरणे अपेक्षित आहे. यामुळे तुम्हांला उच्च शिक्षणासाठी कोणते क्षेत्र निवडावे, याचे मार्गदर्शन मिळेल. तुम्ही सेवाभावी कार्य वा सामाजिक कार्य करू इच्छिता किंवा स्पर्धा परीक्षांची तयारी करू इच्छिता, त्यासाठी तुम्हांला राज्यशास्त्राचा अभ्यास निश्चितच फायद्याचा ठरेल. तुम्ही आयुष्यात पुढे काय करू इच्छिता, हे ठरवण्यासाठी नियोजन करण्यात तुम्हांला राज्यशास्त्र विषयाची निश्चितच मदत होईल.

या अभ्यासाकडे जगाला सामोरे जाण्याच्या मार्गातील एक पायरी म्हणून बघा. खूप शुभेच्छा !

# जग – राजकीय (प्रमुख देश)

